वाचले :- १) महाराष्ट्र जमीन महसूल ( शासकीय जमीनीचे वितरण ) नियम १९७१ चे नियम ६
२) अध्यक्ष, श्री. गुरुदत्त सार्वजनिक वाचनालय भालेर ता.जि. नंदुरबार यांचा दि. ०२.०९.२००५ चा अर्ज.
३) उपविभागीय अधिकारी, नंदुरबार यांचे शेवट होणारे पत्र क्र./ २०११ / गांवठाण / कावि / १८० दिनांक १८.०२.२०११

क्रमांक-२०१२/ब/कक्ष-२/गावठाण/कावि- १९२
जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
दिनांक:-१३/०३/२०१२

**आ दे श**

अध्यक्ष, श्री. गुरुदत्त सार्वजनिक सार्वजनिक वाचनालय, भालेर ता.जि. नंदुरबार यांनी मौजे भालेर येथील गांवठाण मधील २५X४० क्षेत्राची ग्रंथालयासाठी मागणी केली आहे.

प्रस्तुत कामी ग्रामपंचायत भालेर यांनी दिनांक १४.०८.२००३ चा ठराव क्रमांक ३/१ अन्वये संमती दिली आहे.

तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, नंदुरबार यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक-नगर भुमापन / असहका / मोरन / ३ / २०१० जा.क्र. ५१४ दिनांक २५.०२.२०१० अन्वये मोजणी नकाशाची "क" प्रत सादर केलेली आहे.

अर्जदार संस्थेने सह दुय्यम निबंधक नंदुरबार यांचेकडील मागणी जागेचे सन २०११ चे मुल्यांकन रक्कम रुपये २८,१७५/- (अक्षरी अठ्ठावीस हजार एकशे पंचाहत्तर रुपये मात्र) दिनांक १७.०१.२०१२ रोजी चलनाद्वारे शासन जमा केले आहे.

उक्त परिस्थिती नुसार मी जिल्हाधिकारी नंदुरबार प्रस्तावातील पानांक १०७ वरील मोजणी नकाशात लाल रंगाने दर्शविलेले मौजे भालेर ता.जि. नंदुरबार येथील सरकारी ग.नं. १ क्षेत्र १.३७ हे.आर. पैकी १०X१०= १०० चौ.मि. क्षेत्र **ग्रंथालयासाठी** अध्यक्ष, श्री. गुरुदत्त सार्वजनिक वाचनालय, ता.जि. नंदुरबार यांना **महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीनीचे वितरण ) नियम १९७१ चे नियम ६ मधील तरतूदीनुसार खालील अटी / शर्तीवर मंजूर करण्यात येत आहे.**

**अटी / शर्ती :-**

१. सदर आदेश महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या अधिन नियमांचे तरतूदीस अधीन राहून काढण्यात येत आहे.
२. अर्जदार संस्था मंजूर जमीन भोगवटदार वर्ग-२ म्हणून धारण करील. जमिनीचे अथवा तिच्या भागाचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर / तारण / गहाण करता येणार नाही.
३. प्रश्नाधिन जागेचा उपयोग ज्या प्रयोजनार्थ जागा मंजूर करण्यात आली आहे त्या करिताच केला पाहिजे. तसेच सदर जागेवर या आदेशाचे तारखेपासून २ वर्षाचे आंत बांधकाम पूर्ण करावे व पूर्णपणे याच कामासाठी जागेचा वापर झाला पाहिजे.
४. सदर जागेवर करावयाच्या बांधकामाचे आराखडे स्थानिक स्वराज्य संस्था / जिल्हाधिकारी, नंदुरबार यांचे कडून रिबन डेव्हलपमेंट रुल्स प्रमाणे मंजूर करुन घ्यावे. व त्याप्रमाणे बांधकाम करावे. मंजूर आराखडया व्यतिरिक्त जादा बांधकाम किंवा बांधकामात बदल अनुज्ञेय राहणार नाही.
५. सदर जमीन किंवा त्या जमीनीचा कोणताही भाग किंवा त्यावरील इमारत यांचा उपयोग मंजूर केलेल्या कारणासाठीच करावा. त्याखेरीज इतर कारणाकरिता हंगामी अथवा कायमचा उपयोग करावयाचा असल्यास त्यासाठी शासनाची आगाऊ परवानगी घेणे बंधनकारक राहील. तशी परवानगी न घेता प्रश्नाधिन जमीनीचा दुस-या करणासाठी वापर होत असल्याचे आढळून आल्यास सदर जमीनी बाबत शासनाचे आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करणेस पात्र राहील.
६. सदर संस्थे मार्फत चालविण्यात येणा-या ग्रंथालय सर्व जाती, धर्म, पंथाच्या लोकांसाठी खुला राहील.
७. प्रश्नाधिन जागेवर अनधिकृतपणे कोणत्याही प्रकारे बदल किंवा बांधकाम पैसा मिळविण्याचे हेतुने केल्यास सदर जमीन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ६७ मधील तरतुदी नुसार बिनशेती आकारास पात्र राहील. तसेच कलम ४५ नुसार येणा-या दंडनीय रक्कम भरणेस सदर संस्था पात्र व जबाबदार राहील. तसेच सदर रक्कम जमीन महसूलाची वसूली म्हणून वसूल करण्यात येईल.
८. सदर जमीनीचा किंवा तिच्या कोणत्याही भागाची कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी भावी काळात शासनास आवश्यकता असेल तर ती जमीन परत घेण्यास येणार असेल त्या जमीनीसहीत अगर त्या जमीनीच्या कोणत्याही भागासहीत जमीन घेणा-याने दिलेल्या जमीनीच्या किंमती एवढी भरपाई दिल्या नंतर आणि जमीनीवर कोणतेही बांधकाम असल्यास कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निर्धारित केलेल्या इमारतीचा किंवा बांधकामाचा खर्च दिल्यानंतर शासनाकडेस परत घेणेत येईल.
९. जमीनीतील सर्व खाणी व खनीज पदार्थ तसेच दगड पाणी या वरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमीन देण्यात येईल आणि शासनास खाणकाम व जमीनीतील द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतूदी नुसार त्या ठिकाणी प्रवेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल.

१०. प्रश्नाधिन जमीन ज्या कारणाकरिता उक्त संस्थेस दिली आहे त्या संस्थेने सदर जमीनीचा विकास व इतर आवश्यक सोयी स्वतःचे खर्चाने करुन घ्याव्यात.

११. महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमीनीचे वितरण ) नियम १९७१ चे नियम ६ चे लगत नमूद केलेल्या फॉर्म नं. १ मध्ये भोगाधिकार मुल्यरहित व सारा माफीने दिलेल्या १०० चौ.मि. जमीनी बाबत उपरोक्त संस्थेने या आदेशाचे तारखे पासून २ महिन्याचे आंत कबुलायत करुन घ्यावी.

१२. शासन महसूल व वनविभागाकडील परिपत्रक क्रमांक : जमीन ०५ / २००७ / प्र.क्र.३२ / ज-१ दिनांक २८ जून २००७ मध्ये नमूद केल्यानुसार मंजुर करण्यात आलेल्या क्षेत्राच्या किमान १०% क्षेत्रावर वृक्ष लागवड करुन त्याची जोपासना करणे बंधनकारक राहील.

१३. वरील पैकी कोणत्याही एका शर्तीचा भंग सदर संस्थेने केल्यास सदर संस्थेस कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता सदर जमीन सरकार जमा करण्यात येईल.

जिल्हाधिकारी नंदुरबार

(स्वाक्षरीत/-)
**जिल्हाधिकारी नंदुरबार**

स्थळ प्रतीवर
मा. जिल्हाधिकारी सो. यांची स्वाक्षरी असे

प्रत :- अध्यक्ष, श्री. गुरुदत्त सार्वजनिक सार्वजनिक वाचनालय, भालेर ता.जि. नंदुरबार
प्रत :- उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषित.
प्रत :- तहसिलदार नंदुरबार यांचेकडेस मूळ चौकशी कागदपत्र पानांक १ ते १५९ सह रवाना.
प्रत :- उपअधिक्षक, भुमी अभिलेख, नंदुरबार यांचेकडेस पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**जिल्हाधिकारी, नंदुरबार करिता**

1389

तहसिल कार्यालय नंदुरबार
संकलन 01/06/01
टपाल र.जि.नं.
दिनांक 15 / 3 / 2012
लिपीक नायब तहसिलदार

2654

क्रमांक/२०१२/गावठाण/मौ/भा/
तहसिल कार्यालय नंदुरबार
नंदुरबार दि १५/३/२०१२

प्रति,
मंडळ अधिकारी रनाळे/कोळदा/भालेर

21 - मा. जिल्हाधिकारी सो नंदुरबार यांचे
आदेश अट क्र ११ नुसार कबुलायत तयार करुन अर्जदार
आदेशातील अटी व शर्तीचे पालन करतात किंवा कसे याबाबत
खुलासा सह अहवाल सादर करावा

तहसिलदार, नंदुरबार